# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४६** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २५२** **दिनांक :-०८/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२६/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४५ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२६/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४५ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२६/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४५ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४६** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २५३** **दिनांक :-०८/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/०५/२०२५-२६ दि.०८/०४/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२७/०३/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२७/०३/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०१/०४/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.०१/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.२४/०३/२०२५ चे रिपोर्टनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा २३७५ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ३ ते ४ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४११२ दि.२४/०३/२०२५ अन्वये १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र असुन, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन मनमाड टर्मिनल यांचे ठोक/बल्कचे प्रती लिटरचे दर रक्कम रु.९२.१९ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.०१/०३/२०२५ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/१४ दि.२४/०३/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**